नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १५० | Issue - 150 | वार बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ | Blow- Wednesday Date 16 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात निवडणुका जाहीर

## २० नोव्हेंबरला मतदान, २३ नोव्हेंबरला निकाल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: बहुप्रतीक्षित अशा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची अखेर घोषणा झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत महाराष्ट्र आणि झारखंड येथील विधानसभा निवडणुकांची घो- षणा केली आहे. २० नोव्हेंबर २०२४ ला राज्यात मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यात एका टप्प्यात निवडणुका पार पडतील. तर, २३ नोव्हेंबर २०२४ ला मतमोजणी होईल. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी तारखांची घोषणा केली.

महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांसाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर करण्यासोबत आजपासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होणार असल्याचीही घो- षणा केली.

निवडणूक आयोगाला २६ नोव्हेंबर २०२४ पूर्वी निवडणुका घेणं बंधनकारक आहे. त्यामुळे त्यापूर्वी म्हणजेच २० नोव्हेंबरला मतदान पर पडेल. तर २३ नोव्हेंबरला मराहाष्ट्रातील जनता महायुतीला निवडते की महाविकास आघाडीला याचा निकाल लागेल.

महाराष्ट्रात किती मतदार?

**महाराष्ट्रात एकूण ९.६३ कोटी मतदार**

महिला मतदार – ४.६६ कोटी

पुरुष मतदार – ४.९७ कोटी

युवा मतदार – १.८५ कोटी

नव मतदार – २०.९३ लाख

राज्यातील मतदान केंद्रांची माहिती

**महाराष्ट्रात १ लाख १८३ मतदान केंद्र**

शहरी मतदान केंद्र – ४२, ६०४

ग्रामीण मतदान केंद्र – ५७,५८२

महिला अधिकाऱ्यांची मतदान केंद्र – ३८८

नव अधिकाऱ्यांची मतदान केंद्र – २९९

**महाराष्ट्रात एकाच टप्प्यात होणार विधानसभा निवडणुका**

निवडणुका या येत्या महिना भरात पार पडणार असल्याने राजकीय पक्षांकडे प्रचारासाठी खूप वेळ शिल्लक आहे. १८ नोव्हेंबरला प्रचार तोफा थंडावतील.

झारखंडमध्ये १३ आणि २० नोव्हेंबरला मतदानाची प्रक्रिया पार पडेल. तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतरची ही पहिलीच विधानसभेची निवडणूक आहे. त्यामुळे, सर्वच पक्षांसाठी ही निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे. या निवडणूक निकालावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. ठाकरेंची साथ सोडून शिंदेंनी शिवसेना मिळवली, तर अजित पवारांनी राष्ट्रवादी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे आता या दोन्ही पक्षांना जनता किती साथ देते पाहावं लागेल.

तर, दुसरीकडे, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंची जादू लोकसभेप्रमाणे पुन्हा कमाल करणार का, याकडे सध्या सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

सध्या दोन्ही आघाड्यांमध्ये जागावाटपावरुन मोठी रस्सीखेच होत असल्याचं पाहायला मिळत आहे. सर्वच पक्ष श्रेष्ठींकडे इच्छुकांची रांग लागलेली पाहायला मि ळत आहे. तर अनेक ठिकाणी नेत्यांचं या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात असं सुरु आहे.

## थोडक्यात

### बॉम्बने उडवण्याची धमकी, विमानाचे आपत्कालीन लँन्डिंग!

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांत विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या धमक्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. या अशा प्रकारच्या धमक्याच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. आता मंगळवारी देखली सात वेगवेगळ्या विमानांमध्ये बॉम्ब असल्याची धमकी मि ळाल्यामुळे मोठी खळबळ उडाली. त्याम ुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. एअर इंडिया एक्स्प्रेसच्या एका विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर उत्तर प्रदेशातील महर्षि वाल्मिकी विमानतळावर या विमानाचे आप्तकालीन लँन्डिंग करण्यात आले. या धमक्या खोट्या असल्याचंही सांगितलं जातं आहे. दरम्यान, यामुळे शेकडो प्रवाशांना अडचणींना समारे जावे लागले.

## स्थगिती नसल्यानेच सात आमदारांच्या नियुक्त्या

**राज्य सरकारची उच्च न्यायालयात भूमिका**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेवरील राज्यपालनिर्दे शित १२ आमदारांच्या नियुक्तीला न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली नव्हती. तसेच, राज्य सरकारनेही या नियुक्त्या करणार नसल्याची हमी दिली नव्हती. या सगळ्या पार्श्वभूम ीवर १२ पैकी सात आमदारांच्या नियुक्त्या केल्याची भूमिका राज्य सरकारच्या वतीने म हाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मंगळवारी उच्च न्यायालयात मांडली. त्यावर, याचिकेवरील निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या करण्यात आल्याची बाब याचिकाकर्त्यांनी केवळ आपल्या निदर्शनास आणून दिल्याचे न्यायालयाने नमूद केले. या पार्श्वभूमीवर राज्यपालनिर्देर्शित सात नवनियुक्त आमदारांचा शपथविधी काही वेळाने पार पडला.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी राज्य सरकारने विधान परिषदेवरील राज्यपाल निर्दे शित १२ पैकी सात आमदारांच्या नियुक्त्या केल्याच्या विरोधात शिवसेनेने (उद्धव ठाकरे) उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे याचिकाकर्ते सुनील मोदी यांच्यातर्फे प्रकरण सादर करण्यात आले. तसेच, या क्षणी कोणताही दिलासा देण्याची मागणी आपण करणार नाही. परंतु, राज्यपाल निर्दे शित १२ आमदारांच्या नियुक्तीप्रकरणी आपण केलेल्या याचिकेवरील निर्णय खंडपीठाने म ागील आठवड्यात राखून ठेवला होता. असे असताना १२ पैकी सात आमदारांची नियुक्ती करण्यात आली, असे याचिकाकर्त्यांच्या वतीने वकील हर्षदा श्रीखंडे यांनी खंडपीठाला सांगितले. त्यावर, न्यायालयाने आमदारांच्या नियुक्त्या करण्यास अंतरिम स्थगिती दिली नव्ह- ती. सरकारनेही नियुक्त्या करणार नाही अशी हमी न्यायालयाला दिली नव्हती. त्यामुळे, नियुक्त्यांच्या निर्णयावर आक्षेप घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असा दावा राज्य सरकारची भूमिका न्यायालयासमोर मांडताना महाधिवक्त्यांनी केला.

दरम्यान, १२ आमदारांच्या नियुक्तीच्या शिफारशीबाबतची यादी विद्यमान सरकारने परत मागवली. त्यानंतर नव्याने १२ आम दारांच्या नियुक्तीच्या शिफारशी राज्यपालांकडे पाठविण्यात आल्याच नाहीत. त्यामुळे, राज्यपालांनी कशावर निर्णय घ्यावा आणि काय निर्णय घ्यावा ? असा प्रश्न उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान उपस्थित केला होता. तसेच मूळ याचिकेवरील आपला निर्णय राखून ठेवला होता.

## केंद्र सरकार, निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाची नोटीस; मोफत योजनांच्या आश्वासनांविरोधात याचिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: निवडणुकांदरम्यान राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या आश्वासनांविरोधात एक नवी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार तसेच, निवडणूक आयोगाकडून उत्तर मागितले आहे. बेंगळुरूचे रहिवासी शशांक. जे. श्रीधारा यांच्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. म नोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ही नोटीस बजावली आहे.



राजकीय पक्षांना निवडणुकीआधी मोफत योजनांची आश्वासने देण्यापासून रोखण्यासाठी प्रभावी पावले उचलण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी विनंतीही याचिकेद्वारे करण्यात आली आहे. ॲड. श्रीनिवास यांनी याचिकादाराच्या वतीने बाजू मांडली.

'मोफत योजनांची खैरात वाटण्याच्या अमर्याद आश्वासनांमुळे सरकारी तिजोरी- वर मोठा आणि बेहिशोबी आर्थिक बोजा पडतो. तसेच, ज्याच्या जोरावर मते मि ळवली गेली, अशी निवडणूकपूर्व दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील, हे सुनिश्चित करण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्व- ात नाही,' याकडेही या याचिकेद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने या विषयाशी संबंधित अन्य याचिकाही एकत्र केल्या आहेत. याआधी वकील आणि जनहित याचिकाकर्ते अश्विनी उपाध्याय यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील विजय हंसरिया यांनी राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या आश्वासनांविरोधातील याचिकांवर तातडीची सुनावणी घेण्याची मागणी केली होती. त्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली होती. मतदारांकडून अवाजवी राजकीय लाभ मिळविण्यासाठी लोकप्रिय योजनांवर पूर्ण बंदी असावी. यामुळे राज्यघटनेचे उल्लंघन होत असून निवडणूक आयोगाने त्यासाठी योग्य प्रतिबंधात्मक उपाय योजले पाहिजेत, असे उपाध्याय यांच्या याचिकेत नमूद करण्यात आले आहे. या याचिकेत पुढे असे म्हणण्यात आले आहे की, राजकीय पक्षांनी निवडणुकीतील फायदा लक्षात घेऊन फ ुकट देण्याची प्रवृत्ती लोकशाही मूल्यांना धोका निर्माण करते आणि संविधानाच्या भावनेला ठेच पोहोचवते. ही प्रथेची ला- चखोरीशी बरोबरी करते, असा युक्तिवाद करत याचा उपयोग सार्वजनिक तिजोरीच्या खर्चावर सत्ता टिकवण्यासाठी केला जातो, ज्यामुळे लोकशाही तत्त्वांना हानी पोहोचू शकते.

## वायनाडच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून प्रियंका गांधींना उमेदवारी जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाने आज महाराष्ट्र आणि झारखंडच्या विधानसभा निवडणुकांची घो- षणा केली. महाराष्ट्रात एका टप्प्यात तर झारखंडमध्ये दोन टप्प्यात निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकीच्याबरोबरच केरळमधील वायनाड आणि महाराष्ट्रातील नांदेड आणि पश्चिम बंगालमधील बशीरहाट लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेतली जाणार आहे.

काँग्रेसने वायनाडच्या पोटनिवडणुकीसाठी प्रियंका गांधी वाड्रा यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वायनाड लोकसभा मतदारसंघात १३ नोव्हेंबर रोजी पोटनिवडणुकीसाठी मतदान पार पडणार आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी वायनाड आणि रायबरेली लोकसभा मतदारसंघामधून निवडणूक लढवली होती. या दोन्हीही म तदारसंघामधून त्यांचा विजय झाला होता. मात्र, त्यानंतर राहुल गांधी यांनी वायनाडच्या खासदारकीचा राजीनामा दिला होता.

दरम्यान, काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी याआधीच जाहीर केलं होतं की, वायनाडम धून प्रियंका गांधी या निवडणूक लढवतील. त्यामुळे आता प्रियंका गांधी या पहिल्यांदाच निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. त्यामुळे वायनाडच्या या पोटनिवडणुकीकडे अनेकांचे लक्ष असणार आहे. वायनाडबरोबर आपले भावनिक संबंध असल्याचा दावा राहुल गांधींनी याआधी केला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये जेव्हा काँग्रेस पक्षाने उत्तर प्रदेशमध्ये सर्वांत खराब कामगिरी केली होती आणि स्वत:राहुल गांधी अमेठी मतदारसंघातून पराभूत झाले हो- ते, तेव्हा केरळमधील वायनाड या लोकसभा मतदारसंघानेच राहुल गांधींना तारले होते.

**राज्यपाल यांनी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींशी साधला संवाद**

**जिल्ह्यातील विविध पाणी प्रकल्प व सिंचन व्यवस्थेची माहिती जाणून घेतली**

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्ह्याचा विविध क्षेत्रात विकास करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत. कृषी, सिंचन ,शैक्षणिक, औद्योगिक, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पर्यटन क्षेत्रासह अन्य क्षेत्रात सर्वांगीण विकास घडवून आणून त्याचा लाभ सर्वसाम ान्यांना मिळवून द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात आयोजित जिल्ह्यातील प्रम ुख अधिकारी यांच्या आढावा बैठकीत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मनपा आयुक्त शितल उगले तेली, सोलापूर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक



अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासह अन्य मान्यवर उप- स्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणासह विविध मोठे, माध्यम व लघु पाणी प्रकल्पाची माहिती घेतली. व जिल्ह्यातील सिंचनाखालील क्षेत्राची माहिती घेऊन त्या अंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध पिकाविषयी जाणून घेतले. तसेच जास्तीत जास्त सिंचन सुविधा उप- लब्ध केल्यास शेतकरी वर्गाला त्याचा लाभ मिळेल असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील आरोग्य सुविधांची माहिती घेताना सर्वसामान्य रुग्णांसाठी शासकीय रुग्णालयामधील एमआरआय, सीटी स्कॅन मशीन, एक्स-रे यासह अन्य मशनरी व्यवस्थित पणे सुरू असली पाहिजे यासाठी संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी. या मशीन वेळ- ोवेळी दुरुस्त करण्यासाठी आवश्यक तरतूद करून ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत रुग्णांना अत्यंत दर्जे दार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी वर्गाची असल्याचे निर्देश राज्यपाल श्री राधाकृष्णन यांनी दिले.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मि णी मंदिराविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली तसेच तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत मंदिर संवर्धनासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली. त्याप्रमाणेच सर्वसामान्य भाविकांना श्री विठ्ठलाचे दर्शन सुलभ व लवकर होण्यासाठी प्रशासनाने सादर केलेला व शास- नाने मंजूर केलेला दर्शन मंडप व स्काय वॉक उपक्रमाचे कौतुक करून भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे राज्यपाल श्री राधाकृष्णन यांनी सुचित केले.

### लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष, उद्योजक, वकील, आय एम ए, संपादक व अन्य मान्यवरांशी संवाद

**सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात योगदान देणाऱ्या उद्य- ोजक, वकील, खेळाडू, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षाचे जिल्हा प्रमुख यांच्याशी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शासकीय विश्रामगृह येथील सभागृहात संवाद साधला. यावेळी सर्व संबंधित मान्यवरांनी सोलापूर येथे नियमित विमान सेवा सुरू करणे, बोरामणी येथील कार्गो विमानतळ सुरू करणे, हातमाग उद्योगाला केला जाणारा वीजपुरवठा दर अधिक असून तो कमी करणे, डॉक्टर्सना संरक्षण असणे, दररोज पाणीपुरवठा शहराला करणे, ड्रेनेज सिस्टीम चांगली करणे, शासकीय रुग्णालयात मशिनरी नियमित सुरू ठेवणे, हद्दवाढ भागाला विशेष निधी देणे, आयटी व गारमेंट पार्क निर्माण करणे, ज्युनिअर वकिलांना स्टायपेंड देणे, बिडी कामगारांना शासकीय योजनांचा लाभ देणे जिल्ह्यातील कामगारांच्या नोंदी करून घेणे आधी मागण्या सूचना व समस्या राज्यपाल महोदय यांच्याकडे मांडल्या.**

सोलापूर महापालिकेच्या कामकाजाचा आढावा घेताना उजनी धरणातून सोलापूर शहराला नियमित पाणीपुरवठा (पान २ वर...)

## संपादकीय....

# केंद्राला नोटीस

निवडणुकांदरम्यान राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या आश्वासनांविरोधात एक नवी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार तसेच, निवडणूक आयोगाकडून उत्तर मागितले आहे. बेंगळुरूचे रहिवासी शशांक. जे. श्रीधारा यांच्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ही नोटीस बजावली आहे. राजकीय पक्षांना निवडणुकीआधी मोफत योजनांची आश्वासने देण्यापासून रोखण्यासाठी प्रभावी पावले उचलण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी विनंतीही याचिकेद्वारे करण्यात आली आहे. ॲड. श्रीनिवास यांनी याचिकादाराच्या वतीने बाजू मांडली. 'मोफत योजनांची खैरात वाटण्याच्या अमर्याद आश्वासनांमुळे सरकारी तिजोरीवर मोठा आणि बेहिशोबी आर्थिक बोजा पडतो. तसेच, ज्याच्या जोरावर मते मिळवली गेली, अशी निवडणूकपूर्व दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील, हे सुनिश्चित करण्यासाठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नाही,' याकडेही या याचिकेद्वारे लक्ष वेधण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या विषयाशी संबंधित अन्य याचिकाही एकत्र केल्या आहेत. याआधी वकील आणि जनहित याचिकाकर्ते अश्विनी उपाध्याय यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील विजय हंसरिया यांनी राजकीय पक्षांकडून केल्या जाणाऱ्या मोफत योजनांच्या आश्वासनांविरोधातील याचिकांवर तातडीची सुनावणी घेण्याची मागणी केली होती. त्यास सर्वोच्च न्यायालयाने सहमती दर्शवली होती. मतदारांकडून अवाजवी राजकीय लाभ मिळविण्यासाठी लोकप्रिय योजनांवर पूर्ण बंदी असावी. यामुळे राज्यघटनेचे उल्लंघन होत असून निवडणूक आयोगाने त्यासाठी योग्य प्रतिबंधात्मक उपाय योजले पाहिजेत, असे उपाध्याय यांच्या याचिकेत नमूद करण्यात आले आहे. या याचिकेत पुढे असे म्हणण्यात आले आहे की, राजकीय पक्षांनी निवडणुकीतील फायदा लक्षात घेऊन फुकट देण्याची प्रवृत्ती लोकशाही मूल्यांना धोका निर्माण करते आणि संविधानाच्या भावनेला ठेच पोहोचवते. ही प्रथेची लाचखोरीशी बरोबरी करते, असा युक्तिवाद करत याचा उपयोग सार्वजनिक तिजोरीच्या खर्चावर सत्ता टिकवण्यासाठी केला जातो, ज्यामुळे लोकशाही तत्त्वांना हानी पोहोचू शकते.

# आंबेडकरी चळवळीतील लढवय्या पॅंथर तानाजी कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे धाराशिव जिल्ह्या समन्वयक तथा आंबेडकरी चळवळीतील लढवय्या पॅंथर मा.तानाजी कदम (तुळजापूर) यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा.

मा.तानाजी कदम हे भारतीय दलित पॅंथर चळवळीच्या माध्यमातून केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारीता राज्य मंत्री भारत सरकार तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदास आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली शालेय जीवनापासून सक्रिय असून आता पर्यंत त्यांनी एक पक्ष एक नेतृत्व एक निष्ठाआणि निळा झेंडा हे सुत्र जोपासत नामदार रामदास आठवले साहेब यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची एकनिष्ठ राहिले आहेत. कितीही प्रसंग आले तरी त्यांनी पक्षावरील निष्ठा कायम ठेवली आहे.रिपब्लिकन पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची सर्वत्र ओळख असून नामदार रामदासजी आठवले साहेब यांचे अत्यंत निकटवर्तीय कार्यकर्ते



म्हणून ते मानले जातात.रिपाइं तुळजापूर तालुका अध्यक्ष म्हणून बराच काळ त्यांनी गाजविला आहे.

दरम्यांच्या काळात त्यांनी गाव तेथे शाख हा उपक्रम राबवून तालुक्यातील प्रत्येक गावात रिपब्लिकन पक्षाची बांधणी केली.तालुक्याती गावा गावात जाऊन दलित वस्तीतील समस्या जाणून घेऊन बहुजनांच्या न्याय हक्कासाठी तालुका कचेरीवर मोर्चे, रास्ता रोको, प्रसंगी उपोषण,धरने आंदोलन वगैरे आंदोलने करून बहुजन समाजाला न्याय देण्यासाठी संघर्ष केला. तुळजापूर येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या ठिकाणी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा यासाठी आपल्या सर्व कार्यकर्ते यांना सोबत घेऊन सातत्याने आंदोलन करून शासनाकडून

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याची मागणी मंजूर करून घेतली.आज भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा बसविण्याचे काम प्रगती पथावर आहे.याकामी आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी आपले योगदान दिले असले तरी ही मा.तांनाजी कदम यांनी याकामी दिलेले योगदान हे सर्वाधिक आहे हे नाकारता येत नाही.चळवळीत प्रत्येकाला तालुका अध्यक्ष पदाची संधी दिली पाहिजे या जाणिवेतून त्यांनी रिपाइं चे प्रदेश जॉइंट सेक्रेटरी तथा जिल्हा अध्यक्ष मा्.राजाभाऊ ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा सरचिटणीस म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि प्रामाणिक पणाने त्यांनी ती जबाबदारी पार पाडत आहेत.एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांची जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड व्हावी असी भावना अनेक कार्यकर्त्यांची आहे.पण पक्षश्रेष्ठींनी घेतलेला निर्णय हा सर्वमान्य असतो याची जाणीव मा.तानाजी कदम यांना आहे. त्यामुळे ते कसल्याही प्रकारची हालचाल न करता पक्ष नेतृत्वाकडे आपल्या हक्कासाठी मागणी केली आहे.सामाजिक जाणिवेतून बहुजनांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करणारा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळखला आहे.

दि.१६ आऑक्टोबर हा दिवस त्यांचा वाढदिवस आहे त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना हार्दिक शुभेच्छा.

**– एस.के.गायकवाड**
(रिपाइं (आठवले) जिल्हा समन्वयक तथा पत्रकार) मु.पो. वागदरी,ता.तुळजापूर

# डुबेरे विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला वाचनाचा आस्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतरत्न, भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रामदास वाजे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक दिंगबर जाधव, सोमनाथ गिरी ,कचेश्वर शिंदे,सोमनाथ पगार,अरुण डावरे,विद्या ठाकरे,सविता खंडागळे ,राजेंद्र गांगुर्डेआदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले होते .यावेळी विद्यालयातील ७५० विद्यार्थ्यांनी वाचनाचा आस्वाद घेतला.



यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे म्हणाले की,मोबाईल संस्कृतीमुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. पर्यटनापेक्षा वाचन स्वस्त आहे .ज्ञान प्राप्तीचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे पुस्तकांचे वाचन होय .वाचनाला वेळेचे बंधन नसते.वाचनामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले पाहिजे.वाचनाने बुद्धी तलखं होते. म्हणून विद्यार्थ्यांनी पुस्तकांचा आस्वाद घ्यावा. वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांनी दररोज वाचन करण्याचा संकल्प करावा असे आव्हान वाजे यांनी केले.

उपशिक्षक सुनिल ससाणे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवन व कार्याची ओळख करून दिली.मी वाचलेले पुस्तक याविषयी अंकिता ढोली,गौरी वाजे, आरोही जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी केले तर आभार डी. एच.जाधव यांनी मानले .यावेळी मारुती डगळे,रेखा खंडीझोड, सीमा गोसावी, सुनिता ढोली,जयश्री गोहाड ,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

(पान १ वरून..) करण्यासाठी टाकण्यात येत असलेल्या व ९० टक्के काम पूर्ण झालेल्या दुहेरी पाईपलाईनच्या कामाचाही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी आढावा घेतला. तसेच महापालिकेला करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाविषयी त्यांनी माहिती जाणून घेतली. तसेच पोलीस विभाग जिल्ह्यात शांतता ठेवण्यासाठी राबवत असलेल्या विविध उपाय योजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याच्या विविध विकासात्मक कामाची माहिती पावर पॉइंट सादरीकरणाद्वारे राज्यपाल महोदय यांच्यासमोर सादर केली. यामध्ये जिल्ह्याची सर्वसामान्य माहिती, कृषी, आरोग्य, सिंचन, पाणी प्रकल्प, तीर्थक्षेत्र विकास आराखडा, पर्यटन आराखडा आरोग्य, शैक्षणिक तसेच पारधी समाजाच्या वंचित नागरिकांना मतदार कार्ड वाटप आदी बाबत माहिती दिली. तसेच महापालिका आयुक्त श्रीमती उगले तेली यांनी हे महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध योजनांचे सादरीकरण यावेळी केले. शहर पोलीस आयुक्त राजकुमार यांनी शहरी भागातील तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ग्रामीण भागातील पोलीस विभागाच्या कामकाजाची माहिती दिली. त्याप्रमाणेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. महानवर यांनी विद्यापीठाच्या वतीने राबवण्यात आलेले विविध अभ्यासक्रमाची माहिती सादर केली. तसेच विद्यापीठास शैक्षणिक उपक्रम राबवताना येत असलेल्या अडचणीची माहिती देऊन त्या सोडवण्याबाबत सहकार्य करण्याची मागणी केली.

# कांदलगाव येथे नेत्र तपासणी शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी / अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील कांदलगाव येथे माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास कांदलगाव व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली.



सोनाई परिवाराचे संचालक श्री अतुल माने यांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन पार पडले. कांदलगाव येथील श्री दत्त मंदिर येथे सकाळी दहा ते पाच या वेळेत ६५३ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ४०२ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १० नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

कांदलगाव येथे पार पडलेल्या या शिबिराचे साधू सरडे, नरेश कुंभार, सुरज काशीद, राजू जाधव, निलेश रंधवे, छगन बनसुडे, अंकुश दोरकर, डॉ. शरद शिर्के, डॉ. तमन्ना शेख, डॉ. संतोष रणवरे, डॉ शेख यांनी या कार्यक्रमाचे संयोजन व व्यवस्थापन पाहिले.

या शिबिराच्या निमित्ताने गणेशजी मोहिते, सनी बंडगर, पांडुरंग राखुंडे, साधू ननवरे, आप्पासो राखुंडे, समाधान राखुंडे, बाळासाहेब हजारे, नवनाथ सरडे, वैभव गिरी, नवनाथ काशीद, साधू सरडे, राजू जाधव, बालाजी काशीद, नरेश कुंभार, विलास मोरे, अतुल जगताप, तुकाराम सुतार, समाधान मदने, निलेश राखुंडे, नामदेव राखुंडे, पप्पू ननवरे, प्रदीप सरडे, सिद्धू कोळी, निलेश रंधवे, महावीर सातव हे मान्यवर उपस्थित होते.

# सासवड येथे भटके विमुक्त यांच्या प्रमाणपत्र शिबीरास नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यातील भटके विमुक्त नागरीकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, विविध प्रमाणत्राची आवश्यकता असते, परंतु पिढ्यान पिढ्या भटकंती करणार्या या गावकुसाबाहेर राहणार्या नागरीकांचे शैक्षणिक प्रमाण नगण्य असल्यामुळे व त्यांच्याकडे कोणतीही स्थावर मालमत्ता नसल्याने त्यांना वरील दाखले काढण्यासाठी पुरावे देणे शक्य नसल्याने, अशा नागरिकांना रेशनकार्ड,आधार कार्ड, मतदान ओळखपत्र जातीचे दाखले, आदी प्रमाणपत्र काढण्यासाठी जिल्हाधिकारी पुणे जिल्हा यांच्या आदेशानुसार, व सामाजिक कार्यकर्ते मनोहरनाना ताथवडकर यांच्या प्रयत्नातून सासवड येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,या शिबिरास नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला,

सासवड येथे पुरंदरचे तहसिलदार यांच्या सहकार्याने मंडल अधिकारी, गावकामगार तलाठी भाऊसाहेब ग्रामसेवक यांच्या माध्यमातून विविध शिबिरांचे आयोजन करुन, तालुक्यातील भटके विमुक्त नागरीकांना वरील दाखले देण्यात येणार आहेत,

सासवड या.पुरंदर येथील वाघिरे महाविद्यालयात भटके विमुक्त विकास परिषदेचे संयोजक मनोहर तथा नानासाहेब ताथवडकर यांनी शिबीराचे आयोजन केले होते.. यावेळी निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील,प्रमोद खळदकर, तलाठी हरीचंद्र फरांदे किशोर शिंदे, निनाद खळदकर, मंडल अधिकारी सुहास कांबळे ,संजय बडधे, देवकर भाऊसाहेब, पुरवठा अधिकारी अश्विनी वायसे, पुरवठा निरीक्षक गोपाळ ठाकरे, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष अमोल जगताप, अतुल पवार, प्रशांत मोहरकर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद



पवार गटाचे तालुका कार्याध्यक्ष बंडूकाका जगताप, सासवड शहर अध्यक्ष बाळासाहेब भिंताडे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी सुनील जगताप, गणेश यादव, अशोक पवार, महादेव खेंगरे पाटील, राजेंद्र जावळेकर गुलाब सोनवणे, यशवंततात्या भांडवलकर आप्पा भांडवलकर अमोल पवार, परक औंदकर, गणपत शितकल, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते, सदर शिबिरास ७०० नागरीकांनी उपस्थिती दर्शविली व १८५ नागरीकांचे विविध प्रमाणपत्रासाठी परीपुर्ण प्रस्ताव प्रशासनाने स्विकारले.

# अनंत चैतन्य प्रशालेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : असाध्य ते साध्य करिती सायास कारण अभ्यास तुका म्हणे या जगदगुरु संत तुकारामांच्या पंक्तीला साजेसे असे व्यक्तिमत्त्व असलेल्या ,ज्यांनी आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत ज्ञानसाधना केली असे थोर वैज्ञानिक, मिसाईल मॅन, भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, हन्नूर येथे 'वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांच्या हस्ते महान देशप्रेमी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर डॉ. कलाम यांच्या वाचन संस्कृतीचा जागर उज्वल करण्यासाठी,वाचाल तर वाचाल, शिकाल तर टिकाल ज्ञानाची पाहिजे खात्री तर पुस्तकाशी करा मैत्री या संकल्पनांना मुर्त स्वरूप देण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांचे सामुहिक वाचन घेण्यात आले.याप्रसंगी रामेश्वरम सारख्या लहान शहराजवळील




धनुष्यकोडी गावातील एक मध्यमवर्गीय तमिळ मुस्लिम परिवारात जन्मलेल्या पण आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा जनमानसात उमटवलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनाविषयी माहिती सांगत त्यांचा जन्मदिवस हा वाचन प्रेरणा दिन म्हणून का साजरा करण्यात येतो यावर प्रकाश टाकत वाचन ही अशी सिद्धी आहे त्यामुळे आपल्याला एका हयातीत अनेक आयुष्ये जगता येतात, अनुभव विश्व व्यापक होत, जाणिवा समृद्ध होतात, जीवनाच आणि भवतालाच आकलन अधिक सखोल होत. मनाची अव्याहत मशागत करणारा आणि जीवनानुभवाच अनवट दर्शन घडवणारा पुस्तकासारखा दुसरा गुरू नाही असे सांगत ज्याच्यामुळे आपल्या जगण्याला अर्थ प्राप्त होतो अशा पुस्तकांना कवटाळा व मोबाईलचा अनावश्यक वापर टाळा असे आवाहन प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ.मल्लम्मा चप्पळगाव मॅडम यांनी केले तर आभार श्री.अब्दुलअजीज मुल्ला यांनी मानले. यावेळी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने, धनंजय जोजन, शशी अंकलगे,प्रा. रविंद्र कालीबत्ते, प्रा. काशीनाथ पाटील, सहशिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आजच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी,उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई.ओ.सौ.रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी समाधान व्यक्त केले.

# तुळजापूर येथे रिपाइं (आठवले)च्या वतीने धम्म चक्र प्रवर्तन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग (एस.के.गायकवाड): रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने तुळजापूर (जिल्हा धाराशिव) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात अशोक विजया दशमीचे औचित्य साधून दि.१४ऑक्टोबर २०२४रोजी धम्म चक्र प्रवर्तन दिनाचा ६८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अशोका विजया दशमीला दि.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दिक्षा भूमीवर आपल्या लाखो अनुयायासह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन ऐतिहासिक धम्म (धमांतर) क्रांती घडवून आणली आणि आपणा सर्वांना विज्ञानवादी कर्मकांड मुक्त बौद्ध धम्म दिला.म्हणून अशोका विजया दशमी (दसरा) हा दिवस धम्म चक्र प्रवर्तन दिन म्हणून संबंध देशभरात मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमाने साजरा केला जातो.

त्याचाच भाग म्हणून दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी तुळजापूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे धाराशिव जिल्हा समन्वय समितीचे सदस्य तानाजी कदम विधानसभा अध्यक्ष प्रकाश कदम, कामगार आघाडी अध्यक्ष आप्पा कदम, महादेव सोनवणे,विजय गायकवाड,सुरेश चौधरी, बाळू कदम,तनु डावरे,मराठा आघाडीचे अध्यक्ष नागनाथ गाडे प्रा.अशोक कांबळे, नागनाथ मस्के,बाबा हावळे सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि. १६ ऑक्टोबर २०२४ 

## थोडक्यात...

### डी मार्ट ते सिमला नगर दरम्यान अपघात

सोलापूर, (प्रतिनिधी) : डी मार्ट ते सिमला नगर दरम्यान कार व दुचाकीचा अपघात झाल्याची घटना १३ ऑक्टोबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी सिद्धाराम आप्पासाहेब देशमुख (वय-६२-,रा. कित्तूर चन्नम्मा नगर, सोलापूर यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून कार क्रमांक एम.एच.१४.एच.डब्लू ३७७६ यातील अज्ञात कारचालक व अज्ञात वाहन चालक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे त्यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीजी.५५४७ वरून घराकडे जात असताना दुचाकी क्रमांक एमएच.१३. एएस.५७६७ या वाहनचालकास समोरून येणारी कार क्रं.एमएच.१४.एच.डब्लू.३७७६ यातील चालकाने भरधाव वेगात वाहन चालून विरुद्ध दिशेने येऊन दुचाकीला ठोकर मारून अपघात केला आहे तसेच या अपघातात फिर्यादीस व एमएच.१३.एएस.५७६७ यावरील चालकास गंभीर व किरकोळ दुखापत होण्यास तसेच त्यांनी वाहनांचे नुकसानीच कारणीभूत ठरला आहे. अशा आशयाची फिर्याद सिद्राम देशमुख यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार फुलारी हे करीत आहेत.

# हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देऊ नये, पाटील यांच्या उमेदवारीला काँग्रेस भवनावरून विरोध

## जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी / अतुल सोनकांबळे

इंदापूर शहरातील काँग्रेस भवन हे हर्षवर्धन पाटील यांच्या ताब्यात आहे. काँग्रेस भवन जोपर्यंत पुन्हा काँग्रेसच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देऊ नये अशी मागणी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष पुरंदर हवेली-चे आमदार संजय जगताप यांनी कॉंगेस पक्षाकडे केली आहे.

हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीला काँग्रेस भवनावरून विरोध

हर्षवर्धन पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच शरद पवार गटात प्रवेश केला होता. यानंतर शरद पवार गटातील नाराज नेते आप्पासाहेब जगदाळे, प्रवीण माने ,भरत शहा यांनी हर्षवर्धन पाटलांच्या उमेदवारीला विरोध दर्शवलेला आहे.

### इंदापूरात मेळावा घेत शरद पवारांनाही इशारा

**दुसरीकडे, इंदापूरात हर्षवर्धन पाटील यांच्याविरोधात शरद पवारांच्या पक्षातील नेते एकवटल्याचं चित्र आहे. प्रवीण माने, अप्पासाहेब जगदाळे, भरत शाह यांच्या उपस्थितीत इंदापुरात परिवर्तन मेळावा घेण्यात आला होता. या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. या मेळाव्यामध्ये शरद पवार यांनी आपला निर्णय मागे घ्यावा नाहीतर महाराष्ट्रातील मोठी बंडखोरी इंदापूरमध्ये होईल. असा इशारा दशरथ माने यांनी परिवर्तन मेळाव्यातून इशारा दिला आहे.**





आता आमदार संजय जगताप यांनी देखील हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीला काँग्रेस भवनावरून विरोध दर्शवला आहे. यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत काल आमदार संजय जगताप यांची बैठक झाली. त्यानंतर इंदापुरातील कार्यकर्त्यांनी काँग्रेस भावनाचा मुद्दा पुढे केला. त्यानंतर आमदार संजय जगताप यांनी यशोमती ठाकूर यांच्याकडे जोपर्यंत इंदापूर पक्ष कार्यालय पुन्हा एकदा काँग्रेसला मिळत नाही. तोपर्यंत हर्षवर्धन पाटील यांना उमेदवारी देऊ नये अशी मागणी काँग्रेस पक्षाकडे केली आहे.

**काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून हर्षवर्धन पाटलांना विरोध**

दरम्यान, इंदापूर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीला विरोध दर्शवला आहे. हर्षवर्धन पाटील यांच्या ताब्यात असणारी इंदापूर काँग्रेसची इमारत जोपर्यंत ते पक्षाला परत करत नाहीत तोपर्यंत आम्ही त्यांचं काम करणार नाही असा आक्रमक पवित्रा काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. काँग्रेसची इमारत परत करा मगच आम्ही त्यांचं काम करू असं या पदाधिकाऱ्यांचे म्हणणं आहे.

# वनसगाव येथून तरुण बेपत्ता

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील वनसगाव येथील रहिवासी ईश्वर रामदास अस्वले यांचा भाचा आकाश उर्फ दीपक अशोक वाळके वय २४ वर्ष राहणार जळगाव फाटा तालुका निफाड हा तरुण माझे घरी जातो असे सांगून घरातून निघून गेला असून तो आज पावतो त्यांचे घरी पोहोचला नाही तो बेपत्ता झाला आहे.



सविस्तर वृत्त असे की, वनसगाव येथील रहिवासी ईश्वर अस्वले हे आकाश उर्फ दीपक वाळके चे मामा असून मामाच्या घरी दीपक आला होता, मी माझे घरी जळगाव फाटा ता.निफाड येथे जात आहे असे सांगून घरातून निघून गेला आहे ,तो आज पावतो घरी पोहोचला नाही, दीपक हा रंगाने निमगोरा असून शरीराने सड पातळ आहे, उंची १६५ सें.मी. असून अंगात पिवळ्या रंगाचा शर्ट व सफेद रंगाची फुल पॅन्ट पायात चप्पल हातात डबा होता अशी माहिती ईश्वर रामदास आठवले यांनी निफाड पोलीस ठाण्यात दिली असून तो बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे वरील वर्णनाचा तरुण कोणाच्या नजरेस पडल्यास निफाड पोलीस ठाण्यात कळवावे, पुढील तपास पो .निरी. गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली एस सी घोलप आदी करत आहे,

# मंदिर समितीच्या वतीने राज्यपाल महामहीम सी. पी. राधाकृष्णन यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल महामहीम सी. पी. राधाकृष्णन यांचा शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते श्रीं विठ्ठल रुक्मिणीमातेची मूर्ती व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला.

### मंदिर समितीचे सह अध्यक्ष औसेकर महाराज यांच्या हस्ते केला सन्मान

दि. १५ ऑक्टोबर रोजी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व उद्योजक, व्यावसायिक, पत्रकार, प्रतिष्ठित व्यक्ती, आजी-माजी खासदार व आमदार, जिल्ह्यातील सर्व अधिकारी, राजकीय नेते, राजकीय पक्ष, जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी यांच्याशी शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे त्यांनी संवाद साधला. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील देवस्थानच्या मुख्य विश्वस्तांना देखील आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर उपस्थित होते.



श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा, टोकन दर्शन व्यवस्था, मंदिर जतन व संवर्धन आराखड्या संदर्भात व इतर अनुषंगिक बाबी बाबत त्यांनी माहिती घेतली. तसेच त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, विविध खात्याचे शासकीय अधिकारी, विविध देवस्थानचे विश्वस्त, पत्रकार, एनजीओ चे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जळकोट येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ६८ वा वर्धापन दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के.गायकवाड) : युगपुरुष तरूण मंडळ जळकोट ता.तुळजापूर च्यावतीने येथील भिम नगर मध्ये धम्म चक्र प्रवर्तन दिनाचा ६८ वा वर्धापन दिन विविध उपक्रमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



याप्रसंगी बोलताना सामाजिक कार्यकर्ते तथा रिपाइं (आठवले) चे धाराशिव जिल्हा समन्वयक पत्रकार अरुण लोखंडे म्हणाले की, जगाला शांततेचा, अहिंसेचा आणि समानतेचा संदेश देणारा विज्ञानवादी बौद्ध धम्म डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या असंख्य अनुयासह दिक्षा भूमी नागपूर येथे बौद्ध धम्माची दिक्षा देवून कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर काढून आपणास बौद्ध धम्म दिला असून त्या सद धम्माच्या नितीनियमाचे पालन करून धम्माचे जतन आणि संर्वधन करणे हीआपली काळाची गरज आहे.

येथील युगपुरुष तरुण मंडळाच्या वतीने ६८वा धम्म चक्र प्रर्वतन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होते. प्रारंभी डॉ.बाबासाहेव आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पुजन बौध्द उपासक शितल माने व प्रज्ञा माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले तर शालेय विध्यार्थीनीच्या हस्ते मेणबत्ती प्रज्वलीत करून पत्रकार अरुण लोखंडे यांच्या हस्ते पंचशिल ध्वज्याचे ध्वज्यारोहन करण्यात आला . व सामुदायीक त्रिशरण पंचशिल घेण्यात आले त्यानंतर पुढे बोलताना ते म्हणाले की,आपणास हिन्दू धर्मामध्ये अंत्यत हिन समजले जायचे त्या काळी जनावरांना पाणवट्यावर पाणी पिण्यास मुभा होती पण आपण माणुस असून देखील आपणास तो अधिकार येथील मनूवादी व्यवस्थेने नाकारला होता. या सर्व घटनाचा जेवढा बाबासाहेबना जीवन जगत असतान जो त्रास झाला तो इतर कोणालाही झाला नाही या सर्व बाबीचा कडवट अनुभव डॉ बाबासाहेब आंबेडकर आला होता म्हणुन त्यांनी एके ठिकाणी असे म्हणाले होते की ' मला कोणत्या धर्मात जन्म घ्यावा हे जरी माझ्या हातात नव्हते पण मी कोणात्या धर्मात जायचे हे माझ्या हातात आहे असे ते म्हणटले होते .त्यानी अनेक धर्माचा आभ्यास करून ज्या धर्मांमध्ये कर्मकांड जातीवाद अंधश्रद्धा नाही जिथे माणसाला माणसासारखे मान सन्मान मिळतो तो धर्म म्हणजे बौद्ध धम्म आहे म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी तुम्हा आम्हाला बौद्ध धम्माच्या ओठीमध्ये टाकून दि.१४ ऑक्टोबर १९५६ साली पवित्र धम्म दिला आहे. यावेळी अभिमन्यू लोखंडे महादेव भालेराव पापा लोखंडे सन्नी गायकवाड वैजंता माने लता माने सोनाली लोखंडे प्रतिभा लोखंडे श्रावणी वाघनारे सानिका माने सांची लोखंडे प्रतिक्षा लोखंडे असावरी लोखंडे देवचानी लोखंडे सलोनी माने अंतरा लोखंडे श्रुती भालेराव आरती लोखंडे अर्पिता लोखंडे अनुष्का लोखंडे ईशानी गायकवाड सह बौद्ध उपासक उपासिका युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतीश माने तर आभार बालाजी गुळे यानी मानले



# अक्कलकोट तालुकास्तरीय टॅलेंट हंट समूहनृत्य स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेने पटकावले प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट, (प्रतिनीधी) : अक्कलकोट येथे सोलापूर जिल्हा परिषद अंतर्गत विद्यार्थी गुणवत्ता शोध चाचणी ( टॅलेंट हंट ) या उपक्रमांतर्गत पार पडलेल्या समूहनृत्य स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बऱ्हाणपूर या शाळेने प्रथम क्रमांक पटकावले व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या स्पर्धेत सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे, डोळ्याचे पारणे फेडणारे सादरीकरण करून उपस्थितांकडून कौतुकांची थाप मिळवली. या स्पर्धेत पूजा बंदीछोडे, समृद्धी बनसोडे, यशश्री बनसोडे, निखत फुलारी, साबीर फुलारी, इमरान पिरजादे, श्रवण ईरवाडकर, हर्षदीप कांबळे, मोहम्मद पिरजादे व ऋषिराज उकरंडे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. या स्पर्धेसाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, शिक्षक -पालक संघ, माता -पालक संघ, शाळेच्या मुख्याध्यापिका चिलवेरी मॅडम, सौ.बर्डे मॅडम, श्री राठोड सर व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गर्दी व्यवस्थापन व स्वच्छतेला प्राधान्य

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या अधिकाऱ्यांना सूचना

# कार्तिक यात्रा कालावधीत भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ रोजी कार्तिकी एकादशी असून यात्रेचा कालावधी दि. ०२ ते १५ नोव्हेंबर २०२४ आहे. यात्रा कालावधीत ६५ एकर (भक्ती सागर) येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी ६५ एकर (भक्ती सागर) येथे शेगांवदुमाला ते जुना दगडी पुल या ठिकाणी कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेवून गर्दीचे व्यवस्थापनाबाबत सूक्ष्म नियोजन करावे.तसेच यात्रेत येणाऱ्या भाविकांची कोणतेही गैरसोय होणार नाही याची दक्षता सर्व संबधित विभागाने घ्यावी अशा, सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयी-सुविधासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, कार्यकारी अभियंता अमित निंबकर, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, मंदीर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रांताधिकारी इथापे म्हणाले, यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेबाबत नगर पालिका व मंदिर प्रशासनाची महत्वाची जबाबदारी आहे.या कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा, वाळवंटातील तसेच शहरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत.वाळवंटात पुरेशा प्रकाश राहिल याबाबत नियोजन करावे,धोकादायक इमारतींवर ठळक सूचना फलक लावावेत. अनाधिकृत फलक काढावेत.मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. मंदीर समितीने व नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्ग, नदीपात्रात आवश्यक ठिकाणी बॅरकेंटींग करावे व अग्निशामक यंत्रणा कार्यरत ठेवावी .कार्तिकी यात्रा कालावधीत मंदीर समितीने जादाचे पत्राशेड उभारावेत, दर्शन रांगेत ठिकठिकाणी सूचना फलक लावावेत. मंदीरात तसेच मंदीराभोवती करण्यात येणाऱ्या विद्युत रोषणाईचे फायर ऑडीट व स्काय वॉकचे स्ट्रॅक्चरल ऑडीट करुन घ्यावे.

**तसेच कार्तिक यात्रा कालावधीत वाखरी येथे जनावरांचा बाजार मोठ्या प्रमाणावर भरत असल्याने पशुसंवर्धन विभागाने पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक करावी. तसेच संबधित विभागाने जनावरांच्या व पशुपालकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. अन्न व औषध प्रशासनाने शहर व परिसरातील खाद्य पदार्थाच्या दुकानांची तपासणी करावी. एस.टी महामंडळाने प्रवाशी वाहतुकीचे नियोजन करुन बसस्थानकावर आवश्यक सुविधा उपलब्ध कराव्यात अशा सूचनाही प्रांताधिकारी इथापे यांनी दिल्या.**

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणाले, यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले आहे. नगरपालिकेने शहरातील पार्कीग ठिकाणची लेव्हलिंग करुन झाडे-झुडपे काढावेत तसेच प्रकाश व्यवस्था करावी.मंदीर व मंदीर परिसरात फिरत्या विक्रेत्यांमुळे मोठ्या प्रमाणात भाविकांना त्रास होतो यासाठी जादा हॉकर्स पथकाची नेमणूक करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री. श्रोत्री म्हणाले, कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांना जलद व सुखकर दर्शन व्हावे यासाठी मंदिर समितीकडून योग्य नियोजन करण्यात आले असून, दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये यासाठी जादा सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. दि. ०४ नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढून प्रक्षाळपुजेपर्यंत म्हणजे दि. ०४ ते २० नोव्हेंबर दरम्यान २४ तास श्रींचे दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कालावधीत पत्राशेड येथे पूर्णवेळ अन्नछत्र सुरू ठेवण्यात येणार आहे. दर्शन रांगेतील भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व आवश्यक सोई सुविधा उपलब्ध उपलब्ध करण्यात येणार असल्याचे सांगितले.

यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. पावसामुळे शहरात पडलेले खड्डे बुजविण्याचे काम सुरु असून, स्वच्छतेसाठी जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याचे उपमुख्याधिकारी सुनिल वाळूजकर यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### रेल्वे स्टेशन जवळून दुचाकी पळवली, गुन्हा दाखल

सोलापूर (प्रतिनिधी) रेल्वे स्टेशन जवळ हँडल लॉक करून पार्क केलेली दुचाकी एम एच.१३.सीडब्लू ६०१९ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी रात्री आठ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी सईद अन्वर शौकत शेख (वय-२८,रा. नई जिंदगी) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पो-लीस हवालदार सरतापे हे करीत आहेत.

### तरुणास लोखंडी रॉड बेदम मारहाण ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) तरुणास लोखंडी रॉडने डोक्यात मारून तसेच शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १२ ऑक्टोंबर रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास जे.एम चौक येथे घडली. याप्रकरणी संगपाल परमेश्वर भांगे (वय-२६,रा.न्यू बुधवार पेठ) यांच्या फिर्यादीवरून अभी उर्फ दादा सरवदे व प्रेम पिंटू सुर्वे (रा.आडवा नळ,आंबेडकर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी व अवि सरवदे तसेच मित्र आदित्य कदम असे मिळून धम्मचक्र परिवर्तन मिरवणूक पाहण्याकरिता वरील ठिकाणी गेले होते. त्यावेळी संशयित आरोपीचे मित्र आदित्य याच्या दुचाकीवरून भांडण चालू असताना त्यांचे भांडण सोडवण्यासाठी अवि हा फिर्यादीस तुझा इथे काय संबंध आहे. असे म्हणून शिवीगाळ करून लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले. तसेच प्रेम सुर्वे याने फिर्यादीला माझ्या मित्रासोबत भांडण करतो का असे म्हणून शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

# मुख्यमंत्र्यांनी पंढरपुरातील मराठा भवनासाठी दहा कोटी निधी दिला



## शिवसेना समन्वयक महेश साठे यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाच्या वादात पंढरपूर मराठा भवन बांधण्यात यावी अशी मागणी या मागणीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदील दाखवला. व तात्काळ पाच कोटी रुपयांची निधीची तरतूद व मागील आषाढी यात्रेच्या एकनाथ शिंदे ही पंढरी झाली होती त्यावेळी त्यांनी या वास्तूच्या बांधकामासाठी देण्याचे वचन दिले होते व हे वचन पुनत्वास नेले आहे या निधीच्या मंजुरीचा त्यांनी काढला आहे. या मुख्यमंत्रीच्या या कामाबद्दल शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख व नियोजन समितीचे सदस्य श्री महेश ( नाना ) साठे यांनी मुख्यमंत्री चे आभार मानले.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे सत्यता आणि आणि प्रामाणिकपणा याबाबत प्रसिद्ध आहे. पंढरपूर येथे मराठा भावनाच्या कामातून पुन्हा एकदा आहे म राठा आरक्षण आंदोलनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस येथील मराठा बांधवांनी मराठा भवन बांधण्याची आषाढी एकादशीच्या आले असता बांधकामाचा शुभारंभ केला होता. या बांधकामासाठी त्यांनी पाच कोटी रुपये निधी दिला होता.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या वाद-ात मराठा भवन बांधण्यात यावे अशी मागणी पुढे आली व या मागणीला मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आषाढी यात्रेदरम्यान पंढरपूरकरांना दिलेला शब्द पाळला आहे. भवन या वास्तूसाठी आणखी दहा कोटी निधी रुपयांचा निधी सरकारच्या मावळत्या कार्य करत आहे याबाबतचे पत्र मुख्यमंत्री यांचे ओएसडी यांनी श्री महेश साठे यांच्याकडे सुपूर्त केली ही पंढरपूर यांसाठी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा शिवसेना समन्वयक श्री महेश, ( नाना) व्यक्त केले आहे.

# औसा येथे ओबीसी महा एलगार मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : १३ ऑगस्ट रोजी औसा तालुका जिल्हा लातूर येथे एल्गार रॅली हाश्मी चौकापासून निघून सभा घरापर्यंत गेली तेथे सभा सुरू झाल्या प्रथम संयोजकाने आपले विचार व्यक्त केले त्यानंतर शब्बीर भाई अन्स-ारी ओबीसी चे राष्ट्रीय नेते यांनी सखोल मार्गदर्शन केले त्यानंतर नवनाथ आबा वाघम ारे यांनीही सखोल मार्गदर्शन केले यानंतर प्राध्यापक लक्ष्मण रावजी हाके यांनी आपले विचार सखोल मांडत असताना ते म्हणाले ओबीसीने एकत्र यावे व आपल्या अडीअडचणी सोडून घ्यावे ओबीसी एकत्र आल्याशिवाय अडचणी सुटणार नाहीत असे आव-ाहन केले या शासनाने वसंतराव नाईक महामंडळाला कवडीचीही किंमत न देता एकही टाका बजेट दिलेला नाही असे त्यांनी सांगितले विचार मंचावर भटके विमुक्त संघटनेचे राष्ट्रीय सचिव हरिभाऊजी गायकवाड होते तसेच राष्ट्रवादी राष्ट्रप्रेमी मुस्लिम ओबीसी चे



नेते माननीय मकबूल भाई वलांडी कर साहेब ओबीसी नेते आगे बढो जनता तुम्हारे साथ है म्हणून सभागृह दणाणून सोडले मंचावर आदिवासी नेते रावण राजे आत्राम होते संयोजक अनिल जाधव एडवोकेट शाम गोरे प्राध्यापक नागोराव माळी सर प्राचार्य एकनाथ पाटील ओबीसी नेता जिल्हाध्यक्ष भारत काळे डॉक्टर वहिद कुरेशी नितीन मेहत्रे रणधीर काळे कृष्णा पांचाळ पियुष मेहत्रे विशाल माळी अडवोकेट गोपाळ बुरबुरे पद्माकर वाघमारे नितीन बंडगर आनंद चौधरी दगडूजी पडिले लक्ष्मणराव पोटे अरुण गायकवाड भटके अफजल कुरेशी लातूर अरुण गायकवाड भटके हे सर्व नेते महनाले औसा तालुक्यात ओबीसीचाच सक्षम उमेदवार देऊ निवडून आणू असा मानस सर्वांनी केलेला आहे धन्यवाद

# उल्हासनगरमध्ये रंगले आंबेडकर साहित्य संमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : उल्हासनगरमध्ये थे साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या साहित्य संमेलना-चे उद्घाटन डॉ. संजय अपरांती यांनी केले. ते यावेळी म्हणाले, आंबेडकरी साहित्य संमेलन म्हणजे एक प्रकारे संसदीय अधिवेशन असून येणारा प्रत्येक साहित्यिक हा आमदार खासदारच आहे. त्यामुळे चळवळ जिवंत राहते. या साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक बी अनिल तथा अनिल भालेराव यांनी आंबेडकरी साहित्य संम ेलनाची भूमिका मांडताना ते म्हणाले, स्वबळावर आंबेडकरी साहित्य घेतले तर चळवळ कोणाची बटीक होत नाही. आंबेडकरी विचार रुजवायचे असेल तर स्वाभिमानी साहित्यिकच साहित्याच्या माध्यमातून सर्वसामान्याचे प्रश्न मांडू शकतात.




या साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष प्रा. आनंद देवडेकर यांनी पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ते पुढे म्हणाले शासन कोणतेही पक्षाची असो आपण त्यांचे निरपेक्ष भावनेने पाली भाषेला अभिजात दर्जा दिल्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. आंबेडकरी साहित्य हेच बौद्ध साहित्य असल्याचे त्यांनीप्रतिपादन केले.

या साहित्य संमेलनात राज्यघटना, आंबेडकर साहित्याचे योगदान या विषयांवर प्रा. दफेदार अकिफ, प्रा. प्रेमरत्न चौकेकर,प्रा. प्रज्ञाकिरण वाघमारे, डॉ. आशा ब्राह्मणेयांनी आपले विचार मांडले. तर कवी संमेलनाचे अध्यक्षपद प्रा. उत्तम भगत यांनी भूषविले. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून आलेल्या कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून जनसामान्यांची भावना मांडली. सदर आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी सुनील दुपटे, सोमकुवर सोमकुवर यांनी परिश्रम घेतले.



# धम्मचक्र प्रवर्तन दिन पुरंदर तालुक्यात उत्साही वातावरणात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ विनायक गायकवाड/ पुरंदर प्रतिनिधी : पुरंदर : ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान सासवड येथे पुरंदर हवेलीचे आम दार संजयजीजगताप यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी भारतीय बौध्द महासभेच्या वतीने त्रिशरण, पंचशील, भीमस्तुती, धम्मपालन गाथा घेण्यात आली.

आमदार संजयजी जगताप यांनी सर्व बौध्द बांधवाना धम्म चक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.विश्र् रत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला शांतीचा संदेश देण-ारा भगवान बुद्धाचा महान धम्म या देशाला देऊन खूप मोठे योगदान दिले.या वेळी बहुजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष सुनिल तात्या धिवार, सचिव कैलास धिवार, सासवड नगरीचे माजी नगरसेवक सोपान रणपिसे

भारतीय बौध्द महासभेचे शेखर पोळ, अनिल मसने, आंनद घोरपडे, सुनिल जगताप आदींनी मनोगत वेक्त केले. सर्व तालुक्यातील जनतेच्या वती-ने महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांची विचार प्रभोधन पर एकच मोठी जयंती साजरी करायची असे सर्वानुमते ठरले.या वेळी उपस्थितमध्ये कॉंग्रेस युवक अध्यक्ष चेतन भैया महाजन, माजी नगरसेवक हापुकाका जगताप, संतोष गिरमे, मोमीन बागवान, पोपट भोसले, डी. जी. गायकवाड, सुमित साबळे, अक्षय गायकवाड, विक्रांतरणपिसे, लक्षिमन लोंढे,यांसह मोठया संख्येने धम्म बांधव उपस्थित होते.

# मंगळवेढा तालुक्यासाठी ६ कोटी ४५ लाख रुपये फळ पिक विमा मंजूर : आ समाधान आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुनर्रचित हवामानावर आधारित फळपेत विमा योजना रब्बी हंगाम २०२३ साठी फळ पिक विमा भरलेल्या शेतकऱ्यांचा विमा मंजूर झाला असून ६ कोटी ४५ लाख ४८ हजार ५१४ विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच वर्ग होणार आहे मंगळवेढा तालुक्यातील १००४ शेतकऱ्यांनी या फळ पिक विमा योजनेमध्ये सहभाग नोंदवला होता त्या शेतकऱ्यांनी एकूण ७५२ हेक्टर क्षेत्रा-वर हा फळ पिक विमा भरला होता यामध्ये द्राक्षासाठी ३०५ शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता त्या शेतकऱ्यांना १ कोटी ८९ लाख २४ हजार २२७ रुपये मंजूर झाले आहेत.



आंबा उत्पादक ३५ शेतकऱ्यांना ४ कोटी ४९ लाख ४२ हजार ८३८ रुपये तर डाळिंब उत्पादक ६६४ शेतकऱ्यांना ४ कोटी ४९ लाख ४२ हजार ८३८ रुपये मंजूर झाले आहेत असा एकूण १००४ शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील आंबे बहार फळपीक विमा मंजूर झाला असून ही मंजूर रक्कम लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# हजारो बौद्ध बांधवांना घेऊन मनसेची धम्मयात्रा नागपूरकडे रवाना : मनसे नेते दिलीप बापू धोत्रे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे उमेदव-ार दिलीप बापू धोत्रे यांच्या वतीने नागपूर दीक्षाभूमी धम्म आयोजन करण्यात आले होते ही धम्मयात्रा रविवारी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील हजारो बौद्ध बांधवांना घेऊन नागपूरकडे रवाना झाली या धम्म यात्रेची सुरुवात पंढरपूर येथील सारनाथ बौद्ध विचार येथे मनसे नेते हस्ते पुष्पहार घालून ग्रहण करून अभिवादन करण्यात आली.



भारतीय राज्यघटनेची निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४ ऑक्टोंबर १९५६ स*** आपल्या अनुयायासह सोबत घेऊन नागपूर येथील दीक्षाभूमी ते बौद्ध धर्माची दिशा घेतली होती हा दिवस धम्मचक्र परिवर्तन दिन म्हणून बौद्ध समुदायांमध्ये महत्त्वपूर्ण आणि आदरणीय मानला जातो तेव्हाप-ासून १४ ऑक्टोबर रोजी देशभरातील लाखो बौद्ध दीक्षाभूमी येथे अभिनंदन करण्यासाठी जातात या धम्मचक्र परिवर्तन दिनाचे औचित्य साधून मनसे नेते दिलीप बाबू धोत्रे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते या धम्म यात्रेला पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील बांधवांनी सहभाग नोंदवून नागपूरकडे रवाना झाली महाराष्ट्र नवनिम ाण सेनेच्या वतीने हिंदू मुस्लिम बांधवांसाठी यांच्या अजमेर यावर आता धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त नागपूर मनसे धम्म यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी : रविशंकर इठूले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोदिंया : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेण्यासाठी खूप मेहनत घेतली. स्वतः चा आणि समाजाचा उध्दार केवळ शिक्षण घेण्याने होऊ शकतो. याची प्रचिती स्वतः डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याम ध्ये उतरवून दाखविली. ही प्रेरणा विद्यार्थी दिशेच्या घटकांनी घ्यायची आहे. तरच विद्यार्थी हा पूढे जाऊ शकतो. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते धम्मचक्र प्रवर्तन सोहळाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.



यावेळी शाळेतील शिक्षक नीता भलमे, साधना पारधी, प्रदीप ढवळे, अस्मिता तेलंग, प्रगती खोब्रागडे, स्वती राणा, कार्तिक शहारे, अर्चना चव्हाण व तुषार महाजन आदी प्रामुख्याने उप-स्थित होते.

याप्रसंगी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करुन उपस्थितांनी अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रम दि. १४ आक्टोबरला सकाळी ११.१० वाजता अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. शाळे-तील विद्यार्थी यांनी सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## नळदुर्ग शहरांच्या सर्वांगिण विकासा सोबत बाजार समिती ही करणार राणा पाटील यांचे प्रतिपादन

# नळदुर्ग शहर स्वातंत्र्य तालुका निर्मितीसाठी नागरिकांनी आशिर्वाद द्यावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग शहराच्या सर्वांगिन विकासाकरिता आणी भविष्यात होणाऱ्या किंवा शहराचे महत्व-पूर्ण प्रश्न सोडविण्यासाठी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत निवडून देऊन जनसेवा करण्याची परत एक बार संधी उपलब्द करून द्यावी शिवाय नळदुर्ग शहरातील अप्पर तह-सील कार्यालयाची उभारणी म्हणजे नळदुर्ग तालुका निर्मितीचे पहिले पाऊल आसुन नळदुर्ग तालुक्याचा प्रश्न लक्षात घेता व नळदुर्ग शहरा-चा काया पालट करायचा असेल तर जनतेनी माझ्यावर विश्वास ठेऊन नागरिकांनी परत विधान भवनात पाठविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न कारावा शिवाय नागरिकांचे महत्व पुर्ण विविध प्रश्न आता नळदुर्ग येथील अप्पर तहसिल कार्यालयात सुटणार आसुन तुळजापूरला फेऱ्या मारण्याची गरज पडणार नाही किंवा नागरीकांची नाहक हेळसांड होणार नाही शिवाय नळदुर्ग शहर तालुका निर्मिती साठी नागरिकांनी भरभरून आशिर्वाद द्यावा आसे परखड मत तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगजित सिंह पाटील यांनी केले.

नळदुर्ग येथे नुकताच नळदुर्ग आप्पर तहसील कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला त्या प्रसंगी बोलत होते.

ते पुढे म्हणाले नळदुर्ग या ऐतिहासिक शहराच्या विकासासाठी कोट्यावधीचा निधी उपलब्ध करून दिला आहे आणि देणार शहरातला विकास माझ्यासाठी खूप महत्त्वा-चा असून यामध्ये लवकरच बाजार समितीची निर्मिती होणार आसुन याच विभागात एम आय डी सी ची निर्मिती होणार आणि बेरोजगारांच्या हाताला काम मिळणार या सर्व गोष्टी लक्षात घेऊन जे तालुक्याचे महत्त्वपूर्ण विषय असतील हे विषय प्रामाणिक पणा-ने सोडवण्याचा प्रयत्न करेन आणि केला आहे प्रथमता आप्पर तहसिल कार्यालयाचे राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते फित कापून उदघाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नळदुर्ग येथील प्रतिष्ठित नागरिक मल्लिनाथ म ाळगे हे होते.

कार्यक्रमाची प्रास्ताविक शफीबाई शेख यांनी केले यावेळी भाजपाचे नेते सुशांत भूमकर माजी नगरसेवक संजय बताले नळदुर्ग शहराध्यक्ष भिमाजी घुगे . श्रमिक पोतदार , माजी नगरसेवक सुधीर भैया हजारे ,सोसायटीचे माजी चेअरमन रणजितसिंह उर्फ राजा ठाकुर जिल्हा परिषदेचे माजी सदस्या गणेश सोनटक्के , माजी नगरसेवक बसवराज धरणे सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव माजी नगरसेवक निरंजन राठोड , बाजार समितीचे चेअरमन अशीष गणेश सोनटक्के , रि पा ई चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे दुर्वास बनसोडे माजी नगरसेविका क्षमाबाई राठोड , पांडु पुदाले , बंडु पुदाले , बबन चौधरी , लहुजी शक्ती सेनेचे




शिवाजी गायकवाड , विलास पुदाले , सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय कोरे भाजपाचे पदमाकर घोडके नंदगाव चे सिद्धेश्वर कोरे किशोर धुमाळ ,